# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०५/२०२५ (शुक्रवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयात सुरू करण्यात येत आहे आंतरराज्य आणि आंतरजिल्हा सीमा तपासणी नाके.

आगामी बकरी ईद सणोत्सव असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दिनांक ३१/०५/२०२५ रोजी पासुन आंतरराज्य आणि आंतरजिल्हा सीमा तपासणी नाके सुरू करण्यात येणार आहे. सणोत्सवादरम्यान असामाजिक तत्वे व गुन्हेगारी प्रवृत्ती असलेल्या लोकांकडुन अवैध रित्या जनावरे ,शस्त्र, दारू, स्फोटके, अंमली पदार्थ इत्यादीची साठा करून वाहतुक केली जाते. नागपुर ग्रामीण जिल्हयाची हद्द मध्यप्रदेश राज्य तसेच भंडारा, चंद्रपुर, वर्धा आणि अमरावती या जिल्हयांना लागुन आहे. मध्यप्रदेशातुन नागपुर शहरात येणारा प्रत्येक मार्ग नागपुर ग्रामीण जिल्हयातुन येत असल्याने अवैध रित्या जनावरे ,शस्त्र, दारू, स्फोटके, अंमली पदार्थ इत्यांदी वाहतुकी व विक्री मुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवुन शकतो. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी वर नमुद बेकायदेशिर कृतींना आळा घालण्यासाठी **मा श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हयात खालील ११ ठिकाणी सीमा तपासणी नाके सुरू करण्यात येणार आहे.**

**पोस्टे केळवद अंतर्गत** १.केळवद ते सौंसर रोड वरील टोल नाका,२. खुर्सापार , **पोस्टे खापा अंतर्गत** ३. सिंरोजी (मध्यप्रदेश राज्य सिमा) चेक पोस्ट, **पोस्टे बोरी अंतर्गत** ४. बोरी वाय पॉईंट, **पोस्टे देवलापार अंतर्गत** ५. देवलापार ते शिवणी रोड वरील मनेगाव टेक ,**पोस्टे रामटेक अंतर्गत** ६.तुमसर कडुन येणाऱ्या मार्गावर, **पोस्टे मौदा अंतर्गत** ७.बोरगाव फाटा नागपुर भंडारा रोडवर ,**पोस्टे कोंढाळी अंतर्गत** ८.खुर्सापार, **पोस्टे जलालखेडा** अंतर्गत

९.मोवाड वाय पाईन्ट जलालखेडा वरूड कडुन येणाऱ्या मार्गावर ,**पोस्टे नरखेड अंतर्गत** १०. सावरगाव पोलीस चौकी समोर,**पोस्टे भिवापुर अंतर्गत** ११.भिवापुर पेट्रोल पंम्प जवळ चंद्रपुर कडे जाणाऱ्या मार्गावर तपासणी नाके दिनांक ३१/०५/२०२५ रोजी पासुन सुरू करण्यात येणार असुन अधिकारी आणि अंमलदार यांची नेमणुक करण्यात आली आहे.

<u>**पोस्टे देवालापार**</u>



## <u>पोस्टे खापा</u>




## <u>पोस्टे बोरी</u>



**पोस्टे मौदा**



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद ०७ जनावरांची सुटका,देवलापार पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक ३०/०५/२०२५ रोजी देवलापार पोलीसांनी अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी जुने पोलीस स्टेशन देवलापार समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक होंडा सिटी वाहन क्रं एम.एच.०४ डि. एक्स ०१८१ ही कार भरधाव वेगाने येताना दिसली. पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याबाबत ईशारा केला असता वाहन चालकाने कार न थांबविता पळुन जावुन चोरबाहुली येथील पुलाजवळ रोडच्या कडेला वाहन सोडुन पळुन गेला. **पोलीसांनी वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये ०७ गोवंश जनावरे असे मिळुन आले**. आरोपीने सदर कार चे मागचे सिट काढुन त्यात ०७ गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष**

**घटनास्थळावरून एक होंडा सिटी वाहन क्रं एम.एच.०४ डि. एक्स ०१८१ किंमती ३,५०,०००/— रूपये. व ०७ गोवंश जनावरे किंमती १,००,००० /— रूपये असा एकुण किंमती ४,५०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन गौ—विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार येथे दाखल करण्यात आले आहे.**

होंडा सिटी वाहन क्रं एम.एच.०४ डि. एक्स ०१८१ **चा चालकच्या विरूध्द प्राणी छळ प्रतिबंधक अधि. सहकलम महा. पशु संरक्षण अधिनियम सहकलम ११९ म.पो.का ,सहकलम १८४ मो.वा.का .अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ

दिनांक ३०/०५/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ नियोजीत करण्यात आला होता. सदर समारंभात श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी १. पोलीस उपनिरीक्षक श्री विलास सत्यवान गेडाम ,नेमणूक केळवद पोलीस स्टेशन,नागपुर ग्रामीण जिल्हा , २. श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्रीमती दुर्गा दिलीप शंभरकर, नेमणूक पोलीस स्टेशन कुही नागपूर ग्रामीण, ३.सहायक फौजदार श्री प्रकाश बळीराम खोपे, नेमणूक पोलीस स्टेशन कळमेश्वर नागपूर ग्रामीण यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देवुन सत्कार करण्यात आला असुन श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण, मानव संसाधन शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अजय मानकर व मानव संसाधन शाखेचे अंमलदार हजर होते.


महाराष्ट्र पोलीस
अधीक्षक


महाराष्ट्र पोलीस
अधीक्षक


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
अधीक्षक
ग्रामीण


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हस नोंद , पारशिवणी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :–दिनांक २८/०५/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा डोरली शिवार येथे नाकाबंदी केली असता **आयसर ट्रक क्र एमएच ३१ सीक्यु ९४९८** हा मिळुन आला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी मोहम्मद अशपाक शेख महबुब, वय ४७ वर्ष, रा. बिनासंगम, ता.कामठी हा मिळुन आल्याने त्याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **वाहन मालका बाबत विचारपुस केली असता नमुद वाहन मालक नामे** दिनेश नथ्थुजी भडंग रा बिनासंगम **अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) आयसर ट्रक क्र एमएच ३१ सीक्यु ९४९८** किमती ५,००,०००/–रूपये **२)** २ ब्रास रेती किंमती ६,०००/– रूपये असा एकुण ५,०६,०००/–रूपयेचा माल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद चालक /मालक आरोपीतांविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या १९ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत **दिनांक २९/०५/२०२५** रोजी पोलीसांनी गुप्तबातमीदाराच्या महीतीच्या आधारे पेट्रोलींग करून अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद केले आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** :— मौदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्र. १ नामे ज्ञानेश्वर जामाजी बारापात्रे, वय ५० वर्षे ,रा. मौदा आणि आरोपी क्रं २ खुशाल देवनाथ हेडाड, ,वय ५० वर्षे, रा. गरदेव चौक, मौदा हे मौदा स्मशान घाटाजवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

**पोलीस स्टेशन कन्हान:—** कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रं १) नामे प्रकाश भिकराज गोंडाणे, वय,२२ वर्षे , रा.विवेकानंद नगर हनुमान मंदीर कन्हान हा बी के सी पी शाळेच्या मागे, नदी घाट कन्हान येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन खापरखेडा :—** खापरखेडा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे सत्यशिल मांगो चव्हाण, वय ३५ वर्षे, रा. वार्ड क्र ०१ चिचोली खापरखेडा ता सावनेर जि. नागपुर, हा आठवडी बाजार, वार्ड क्र ०१ येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन देवलापार** :— देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्र.१ रामदास भाउराव मरस्कोल्हे, वय ५० वर्षे ,रा वार्ड क्र ५, पवनी, ता. रामटेक हा मौजा पवनी चिंदाई माता, मंदीर चे बाजुला झुडपीमध्ये अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला, आरोपी क्रं २. धरमचंद श्रीलाल उईके, वय ४२ वर्ष ,रा करवाई, ता रामटेक हा मौजा मानेगाव टेक येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला आरोपी क्रं ३ करीम मोहीन खान, वय ३२ वर्षे, रा. करवाई ता रामटेक हा मौजा सावरा फाटा येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.आरोपी क्रं. ४ विनायककुमार विष्णुप्रसाद त्रिवेदी, वय ३० वर्षे, रा. देवलापार ता रामटेक हा मौजा गुप्तगंगा देवस्थान जवळ, वंडबा येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— पारशिवणी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रमांक १. समीर दिलीप मेश्राम, वय १९ वर्षे, रा. वार्ड क्र १२, खारी मोहल्ला, पारशिवनी हा तिन मंदीर जवळ मौजा पारशिवनी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला, आरोपी क्रं २ नामे रोशन श्रावन रंगारी वय १९ वर्षे ,रा महादुला ह. मु. मंगलनगर पारशिवनी हा बिटोली शिवारातील सार्वजनिक हनुमान मंदीर जवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— कोंढाळी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रमांक १. मयंक टिकाराम मेश्राम,वय २० वर्ष आणि आरोपी क्रं २. रुपक हेमराज पाटील, वय २० वर्षे, दोन्ही रा. लेंडीपुरा कोंढाळी हे दोघे हा वर्धा रोड कोंढाळी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

**पोलीस स्टेशन नरखेड** :— नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी रामचंद्र कोंडु कवडती, रा. चौरखैरी, तह. नरखेड हा चोरखैरी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.आरोपी क्र.२ सुरेश बाबुरावजी बनाईत, वय ३४ वर्ष,रा नरखेड हा रेल्वे गेट समोर अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.आरोपी क्रं ३ दिवाकर लक्ष्मण राउत वय ५५ वर्ष रा मोवाड हा मौजा मोवाड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन काटोल**:— काटोल पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी पुरूषोत्तम तुळशिरामजी घाटोळे,वय ४५ वर्षख्रा. लोणारा त. कामठी हा तारबाजार येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— जलालखेडा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी चंद्रशेखर मूरलीधर सोनेकर, वय ३५ वर्षे ,रा खडकि जि. नागपूर हा भारसिंगी बसस्टॅड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.आणि आरोपी क्रं २ आकाश कचरू ऊईके, वय ३२ वर्ष रा. नारसिंगी ता. नरखेड जि. नागपुर हा मौजा जामगाव फाटा ते उमठा रोड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन केळवद:—** केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे बबन भिमराव बांबाळे वय ३७ वर्ष धंदा मजुरी रा वार्ड नं २रामपुरी ता. सावनेर हा केळवद शिवार तापसी ढाब्याचा मागे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या वर नमुद एकुण १९ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**